महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,**
शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
कार्यालयाचा दुरध्वनी क्र.२६४७ ४४ ३५ website : www.msbve.gov.in Email : chairman-msbve@nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-१/ता.मा.(LOI)/२०७४ /२०१४
दिनांक :- - 7 NOV 2014

विषय :- शैक्षणिक **वर्ष २०१५-१६** मध्ये संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रमासाठी **स्थायी संलग्नता मान्यता प्रदान करण्यासाठी तात्पुरती मान्यता (Letter Of Indent)** प्रदान करणे.

संदर्भ:- १) संचालनालयाचे पत्रक्र.४/व्हीओसी/२२०३/२०१४/४४०,दिनांक १७/१०/२०१४

**कार्यालयीन आदेश :-**

ज्या संस्थांनी स्थायी संलग्नता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केले होते. अशा संस्थांना ५ वर्षासाठी /कायम स्वरूपी स्थायी संलग्नता मान्यता प्रदान करण्यापूर्वी अशा सोबतच्या **प्रपत्र -अ मध्ये** दर्शविलेल्या संस्थांना संचानलयाचे संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये अभ्यासक्रम चालविणेसाठी खालील अटींच्या अधीन राहून **प्रथमतः तात्पुरती मान्यता (Letter Of Indent)** देण्यात येत आहे. ज्या संस्थांना तात्पुरती मान्यता (LOI) नाकारणेत आलेली आहे त्याचा तपशिल **प्रपत्र - ब** मध्ये दर्शविणेत येत आहे.

## अटी व शर्ती :-

१ अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन, संचालनालय, मंडळ कार्यालय / संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबंधित कार्यालयांचे कडून वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२ आपले संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी तात्पुरती मान्यता (Letter Of Indent) देणेत आलेली आहे, अशा संस्थांनी अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधांची जसे हत्यारे, यंत्रसामुग्री, साधनसामुग्री आणि फर्निचर्स, विहित शैक्षणिक अर्हतेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणूक करणे, जागा इत्यादींची पुर्ण पुर्तता मान्यता कार्यक्रमानुसार विहित मुदतीत करणे आवश्यक आहे.

३ आपले संस्थेने पायाभूत सुविधांची पुर्ण पुर्तता करतील, अशा संस्थांनी विहित मुदतीत संबंधीत जिल्हयांचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे कार्यालयीन आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासून १ महिन्यांचे आंत आवश्यक ते दस्ताऐवजासह दिलेल्या नमुन्यात अर्ज (नमुना माहितीपुस्तिकेत) सादर करावयाचा आहे.

४ आपल्या संस्थेने दिलेल्या मुदतीत पायाभूत सुविधा पुर्तता झालेबाबतचे अर्ज संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाकडे सादर केला नाही, तर त्या संस्थांना ५वर्षासाठी अथवा कायम स्वरूपी स्थायी संलग्नता मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, नोंद घ्यावी.

५ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे ज्या संस्थांचे पायाभूत सुविधा पुर्ण पुर्तता झालेबाबतचे अर्ज प्राप्त होतील अशा संस्थांचे जिल्हा स्तरावरील समितीमार्फत निरीक्षण / तपासणी करणेत येईल. **(जिल्हा समितीने माहिती पुस्तीकेतील ५वर्षासाठी / कायम स्वरूपी स्थायी संलग्नता मान्यता प्रदान करणेसाठीचा नमुना व त्याबाबतचे मार्गदर्शक सूचना प्रमाणे निरीक्षण करावयाचे आहे.)** यासाठी संबंधीत संस्थेने छाननी तक्त्यात दिलेप्रमाणे सर्व बाबींचा तपशिल समितीसमोर तपासणीसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

६ मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थांना, ज्या जागेत तात्पुरती मान्यता (LOI) देणेत आलेली आहे. त्याच जागेसाठी विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता प्रदान करणेत येईल. जर जागा बदल आढळलेस संबंधीत संस्थेची मान्यता रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

७ विहित आवश्यक असलेल्या पायाभुत सुविधांची पूर्ण पुर्तता करीत असलेल्या संस्थांनाच मंडळामार्फत विद्यार्थी प्रवेश करणेसाठीची मान्यता प्रदान करणेत येईल.

८ मंडळाकडून विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळालेशिवाय संबंधीत संस्थांना अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी प्रवेश करता येणार नाही. जर संस्थेने अशा मान्यतेपूर्वी विद्यार्थी प्रवेश केलेस, असे प्रवेश ग्राहय धरणेत येणार नाही. आणि याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

९ प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गांची सेवा / वेतन व तद्अनुषंगीक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. याबाबत शासन व शासन अधिपत्या खालील कोणत्याही कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१० शासन शुध्दीपत्रक क्रमांक : व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि.१६ जानेवारी, २०१३ अन्वये आवश्यक ती अनामत रक्कम रोखीने चलनाव्दारे अथवा बँक गॅरन्टी च्या स्वरुपात संबंधीत संस्थेने भरणे आवश्यक आहे.

११ ज्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी मान्यता देणेत येईल त्याचा तपशिल मंडळाची वेबसाईट www.msbve.gov.in वर टाकणेत येईल. याप्रकरणी कोणताही पत्रव्यवहार करण्यांत येणार नाही, नोंद घ्यावी.

सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१. मा.संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,**अमरावती** यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, **अकोला** हयांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संबंधीत संस्थेस कळविणेत यावे.
४. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, **अमरावती** त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधीत संस्थेचे निरीक्षण करून आवश्यक त्या दस्ताऐवजासह ( नस्तासह )अहवाल प्रादेशिक कार्यालयामार्फत मंडळ कार्यालयात पाठविण्यात यावे.**( संस्थेच्या विनंतीनुसार )**
५. संगणक विभाग - केवळ मंडळाचे वेब साईटवर टाकणेसाठी.
६. संबंधीत संस्था.

Jamkar/kar.dak.No.

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

संदर्भ :- संचानलयाचे पत्रक्र.४/व्हीओसी/२२०३/२०१४/४४०,दिनांक १७/१०/२०१४

प्रादेशिक कार्यालय :-अमरावती

जिल्याचे नाव :-अकोला

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता तात्पूरती मान्यता( Letter of Indent) देण्यात आलेल्या/नाकारण्यात आलेल्याा संस्थांची नावे / अभ्यासक्रम तुकडी खालील प्रमाणे

| अ. क्र. | संस्था कोड क्र. | संस्थेचे नाव | शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता तात्पुरती मान्यता ( Letter of Indent) देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या (प्रपत्र-अ) | | | | | शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता तात्पुरतीमान्यता ( Letter of Indent) नाकारण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या (प्रपत्र-ब) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अभ्यासक्रम कोड क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडी संख्या | माध्यम | ज्या नावाने आणि ज्या जागेत स्थायी संलग्नता मान्यता प्रस्तावीत आहे त्याचा पूर्ण पत्ता | अभ्यासक्रम कोड क्रमांक | अभ्यासक्रमाचे नांव | तुकडी संख्या | |
| .१ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | २६००९५ | प्रियदर्शनी ग्रामीण आणि आदिवासी उत्कर्ष फाउंडेशन संचलित प्रियदर्शनी पॅरामेडीकल कॉलेज पातूर अकोला. | २०१२०८ | सी.सी.इन योगा ॲन्ड नॅचरोथेरपी | ४ | म./इं. | प्रियदर्शनी ग्रामीण आणि आदिवासी उत्कर्ष फाउंडेशन संचलित प्रियदर्शनी पॅरामेडीकल कॉलेज पातूर अकोला. | --- | --- | --- | --- |
| २ | २६०११२ | इन्स्टिटयूट ऑफ सोशल वेल्फेअर अकोला संचलित महात्मा फुले पॅरामेडीकल कॉलेज, सन्मित्र कॉम्पलेक्स , तिसारा मजला, कलेक्टर कॉलनी , नवीन बस स्टॅंड मागे, जि.अकोला. | २०१२०८ | सी.सी.इन योगा ॲन्ड नॅचरोथेरपी | १ | म./इं. | इन्स्टिटयूट ऑफ सोशल वेल्फेअर अकोला संचलित महात्मा फुले पॅरामेडीकल कॉलेज, सन्मित्र कॉम्पलेक्स , तिसारा मजला, कलेक्टर कॉलनी , नवीन बस स्टॅंड मागे, जि.अकोला. | --- | --- | --- | १) संस्थेने जागा भाडे करारात खाडाखेड केलेचे आढळून आलेमुळे संबंधीत संस्थेवर FIR दाखल करणेसाठी जिल्हा कार्यालयाने पोलीस स्टेशनला पत्र दिले आहे.<br>२) सबब FIRच्या निकालाचे अधिन राहून तात्पुरती मान्यता (LOI) प्रदान करणेत येत आहे. |
| | | | ४११२०६ | सी.सी.इन योगा प्रि-स्कूल टिचर्स ट्रेनिग | १ | म./इं. | | --- | --- | --- | |
| | | | ४०८११३ | सी.सी.इन कम्यूनिकेशन स्किल ,इंटरप्रिनरशिप ॲण्ड पर्सनालिटी डेव्हलपमेंट | १ | म./इं. | | --- | --- | --- | |
| | | | ४०५२०१ | सी.सी.इन सौदर्य शास्त्र | १ | म./इं. | | --- | --- | --- | |

सचिव

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई ४०० ०५१